# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१०८७**

**अपिलार्थी श्री. शरद बाबुराव पाटील**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.११.२०२३ | ०८.११.२०२३, १९.१२.२०२३, २१.१२.२०२३, ०४.०१.२०२४ | १३.१२.२०२३ | २५.०१.२०२४, २३.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ११.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये पूर्ण माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०८.११.२०२३, दि.१९.१२.२०२३, दि. २१.१२.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २५.०१.२०२४ व २३.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०३.११.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे सादर केलेल्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी कोल्हापूर तसेच मा. सहाय्यक संचालक नगररचना कोल्हापूर या पदावर कार्यरत असताना सदर लोकसेवकांनी अधिकार बाह्यरित्या तसेच गैरइराद्याने जाणिवपूर्वक संगनमताने फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यास पात्र वर्तन केले असल्यास त्या केलेल्या सदर वर्तनाविरोधात अगर गुन्हासापेक्ष खटला दाखल करणारा सक्षम इसम याचे पद याची माहिती तसेच गुन्हा दाखल करणेबाबत कार्यवाहीची पध्दत याची माहिती व या पध्दतीने न्यायालयातील न्यायाधिश याबाबत अशीच माहिती विषयांकित अधिनियमाचे कलम १९७ उप कलम ४ अनुषंगाने देण्यात यावी."*

..२/-

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०८.११.२०२३ रोजी अपिलार्थींचा माहितीचा अर्ज महसूल व वन विभागाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१९.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्याशी संबंधीत दिली व उर्वरित माहितीसाठी जन माहिती अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई व जन माहिती अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत केले.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती मा. उच्च न्यायालयाशी संबंधीत असल्याने अपिलार्थींचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत केला. जन माहिती अधिकारी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०४.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना उत्तर कळविले.

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १३.१२.२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपील अमान्य करुन दि. २५.०१.२०२४ रोजी निकाली काढलेले आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य ठरवून दि. २३.०२.२०२४ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज महसूल व वन विभागाकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले होते. तसेच, त्यांच्या उपलब्ध अभिलेखाप्रमाणे महसूल व वन विभाग यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी एकाच माहिती अर्जामध्ये दोन भिन्न कार्यालयात अधिकारी विरुध्द गुन्हासापेक्ष खटला दाखल करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती विचारली होती. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती कळविलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १२.०८.२०२५**

State Information Commission
Greater Mumbai